म.शि.प्र.मंडळाचे,

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम - २०१८-१९

## अहवाल

1. **योग दिन साजरा :**

   दि. 21 जून, 2018 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने योग दिन साजरा करण्यात आला. या शिबीरास प्राचार्या वनमाला गुंडरे, उपप्राचार्य कांतराव गाडे, डॉ. दिनकर तांदळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या शिबीरास योग शिक्षक प्रा. तत्तापुरे जे. जी. यांचे मार्गदर्शन लाभले.

2. **सल्लागार समितीची बैठक :**

   "राष्ट्रीय सेवा योजना" विभागाच्या सल्लागार समितीची बैठक प्राचार्य डॉ. व्ही.जी. गुंडरे यांच्या अध्यक्षतेखाली दि. 28.06.2018 रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये "राष्ट्रीय सेवा योजना" यांच्या वतीने राबविण्यात येणाया वार्षिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

3. दि. 10 जुलै 2018 रोजी "राष्ट्रीय सेवा योजना" मध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयामध्ये विद्यार्थीसाठी सूचना प्रदर्शित करण्यात आली व ईच्छुक विद्यार्थ्यांकडून अर्जाची मागणी केली. विद्यार्थ्यांकडुन आलेल्या अर्जांची छाननी करून 200 (दोन एकक) स्वंयसेवकांची निवड केली. सदरील यादी रा. से. यो. विभाग विद्यापीठाकडे स्वयंसेवक प्रवेश फी सह सादर केली आहे.

4. **वृक्षारोपण उपक्रम :**

   दि. 01 जुलै ते 07 जुलै 2018 या सप्ताहात वृक्षारोपन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी एकूण 50 वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली. या उपक्रमात प्राचार्य. डॉ. व्ही. जी. गुंडरे, उपप्राचार्य. प्रा. के. डी. गाडे, कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, प्रा. अहिल्या बरुरे व रा.से.यो. विभागातील स्वयंसेकासमवेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचा—यांनी सहभाग नोंदविला.






5. स्वच्छता शिबीराचे आयोजन :

दि. 14 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालय प्रांगणात 15 ऑगस्ट च्या अनुषंगाने रा. से. यो. विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले. महाविद्यालयातील परिसर व क्रीडांगन परिसर स्वयंसेवकाने स्वच्छ केला.









6. **स्वच्छता पंधरवाडा :**

दि. 16 ऑगस्ट ते 30 ऑगस्ट 2018 या कालावधीमध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे, यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, प्रा. अहिल्या बरूरे यांच्या सहकार्याने महाविद्यालय परिसर, आद्यकवि मुकुंदराज समाधी मंदिर परिसर स्वयंसेवकांनी स्वच्छ केला.






7. **केरळ पुरग्रस्त मदत निधी फेरी**

दि. 01 सप्टें, 2018 रोजी रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, डॉ. अहिल्या बरूरे, प्रात्र अनंत मरकाळे, डॉ. रूपेश देशमुख, डॉ. संजय जाधव, प्रा. ज्ञानेश्वर भोसले, प्रा. राहिणी खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेकांनी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शहरातील व्यावसायीक, नागरिक यांच्याकडून रूपये 7500 केरळ पुरग्रस्त मदत निधी उभा केला. सदरील निधी विद्यापीठाने दिलेल्या केरळ मुख्यमंत्री खात्यावर पाठविण्यात आला.


केरळ पूरग्रस्त
म.शि.प्र. मंडळ संचलित,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
अंबाजोगाई, जि.बीड
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
केरळ राज्य पूरग्रस्तांसाठी
मदत निधी फेरी
दि. ०१-०९-२०१८


केरळ पूरग्रस्त
मदत निधी
म.शि.प्र. मंडळ संचलित,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
अंबाजोगाई, जि.बीड
राष्ट्रीय सेवा योजना विभाग


केरळ पूरग्रस्त
मदत निधी


केरळ पूरग्रस्त
मदत निधी

8. सदभावना दिन :

दि. 03 सप्टें, 2018 रोजी सदभावनादिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे यांनी राजीव गांधी यांच्या व्यक्तीमत्वावर प्रकाश टाकला व सदभावना दिनाचे अवचित्य सांगीतले कार्यक्रमधिकारी डॉ. दिलीप भिसे यांनी उपस्थितांना सदभावना दिनाची शपथ दिली. याप्रसंगी व उपप्राचार्य डॉ. डी. आर. तांदळे, प्रा. अहिल्या बरूरे, प्रा. अरविंद घोडके, प्रा. अनंत मरकाळे व स्वयंसेवकाची उपस्थिती होती.





9. साक्षरता दिन साजरा :

दि. 08 सप्टें, 2018 राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे या कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रमाधिकारी अहिल्या बरूरे यांनी केले तर आभार प्रा. राजाभाउ भगत यांनी मांनले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, डॉ. रमेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

10. रा.से.यो. दिन साजरा :

24 सप्टेंबर 2018 हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. 25 सप्टेंबर 2018 रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शेतकरी आत्महत्या संदर्भात संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. मुकुंद राजपंखे यांनी काव्यवाचनाच्या माध्यमातून बळीराजांच्या मुलांना आत्मभान देणारे विचार त्यांनी मांडले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्राधिकारी डॉ. दिलीप भिसे यांनी केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य दिनकर तांदळे हे होते. याप्रसंगी उपप्राचार्य के. डी. गाडे, उपप्राचार्य बी. बी. शिंदे, श्री. अण्णासाहेब खंदारे कार्यक्रमाधिकारी डॉ. अहिल्या बरुरे व महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**11. मुकुंदराज मंदिर परिसर स्वच्छता शिबिर :**

अंबाजोगाई परिसरातील मुकुंदराज हे प्रसिध्द मंदिर आहे. दि. 01 ऑक्टोंबर 2018 रोजी रा. से. यो. विभागाच्या वतीने स्वच्छता शिबीराचे आयोजन करण्यात आले. मंदिर स्वच्छते सोबतच परिसर स्वच्छता याप्रसंगी करण्यात आले. या शिबीरात कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे, डॉ. तांदुळजेकर डी. बी., प्रा. अनंत मरकाळे, प्रा. डॉ. रुपेश देशमुख व स्वयंसेवक उपस्थित होते.





**12. महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती :**

दि. 02 ऑक्टोंबर 2018 रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. अहिल्या बरुरे व महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**13. स्वच्छता रॅलीचे आयोजन :**

15 नोव्हें, 2018 रोजी अंबाजोगाई नगर परिषदेच्या वतीने आयोजित महास्वच्छता अभियान उपक्रमात आमच्या रा.से.यो. विभागाने सहभाग घेतला. शहरातील पंचशील नगर परिसरात रस्ते, नाल्या स्वच्छता करण्यात आली. प्रथम शहरातील मुख्य रस्त्यावरुन सर्व सहभागी महाविद्यालयाचे, कर्मचारी यांची प्रभतफेरी काढण्यात आली.

**14. संविधान दिन साजरा :**

महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने 26 नोव्हें 2018 हा दिन संविधान दिन म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे या होत्या याप्रसंगी उपस्थितांना डॉ. मुकुंद राजपंखे व प्रा. राजरतन देवरे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. दिलीप भिसे यांनी केले तर आभार रा.से.यो. सचिव कृष्णा सांगळे यांनी मानले.

15. जागतिक एड्स दिन जनजागृती उपक्रम :

महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने 1 डिसेंबर 2018 हा जागतिक एड्स दिन निमित्त स्वयंसेवक व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. डॉ. राजेश इंगोले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालय परीसरात एड्स जनजागृती पोस्टर्स लावण्यात आली.

16. रस्ता सुरक्षा अभियान :

महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने डिसेंबरी 2018 रोजी रस्ता सुरक्षा अभियान रॅलीचे उद्घाटन प्राचार्या वनमाला गुंडरे यांनी केले. या रॅलीमध्ये कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. दिलीप भिसे व डॉ. अहिल्या बरुरे व स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी होते.

17. संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी :

20 डिसेंबर 2018 रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी रा.से.यो. विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली यानिमित्ताने महाविद्यालयात श्रमदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

18. दि. 18 जानेवारी 2019 रोजी महाविद्यालयात रा.से.यो. शिबीर घेण्यात आले. 24 जाने, 2019 रोजी मौजे जवळबन येथे संपन्न झाले. शिबीराचे उद्घाटन सरपंच श्री शिवाजी शिंपले यांच्या हस्ते झाले, तर शिबीराचा समारोह महाविद्यालय विकास समिती सदस्य श्री. सय्यद पाशु सर यांच्या उपस्थितीत पार पडला. या 7 दिवशीय शिबीरामध्ये गावातील मुख्य रस्त्याचे दुरूस्तीकरण प्राथमीक शाळेमध्ये वृक्षरोपनासाठी 40 खड्डे खोदण्यात आले.
19. दि. 26 जानेवारी ते 10 फेब्रु. 2019 या दरम्यान महाविद्यालयात लोकशाही पंधरवाडा साजरा करण्यात आला. यानिमित्त निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व पंचायत समिती अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे व डॉ. अहिल्या बरूरे, प्रा. रोजेभाउ भगत, प्रा. प्रशांत सोळंके यांनी केले.









20. स्वच्छता शिबीर :

दि. 14 फेब्रु. 2019 रोजी महाविद्यालयात संपन्न झालेल्या स्नेहसंम्मेलनानंतर स्वच्छता शिबीर घेण्यात आले. रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप भिसे व डॉ. अहिल्या बरूरे यांच्या उपस्थितीत परिसरातील स्वच्छता करण्यात आली.